**राष्ट्रीय कल्याण निधी या केंद्र पुरस्कत योजनेखाली**
**मच्छिमारासाठी घरे व कूपनलिका बांधण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः-मत्स्यवि- ३६९२/(सीआर-१/पदुम-१४,**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**
**दिनांकः- २९ मार्च,१९९७.**

**वाचाः-** १. अवर सचिव, भारत सरकार, कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.१२०१२/१२९६/एफवाय (डब्ल्यु), दिनांक २५.३.१९९६.

२. अवर सचिव, भारत सरकार, कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.१२०३५/८/९५/ एफवाय (डब्ल्यु), दिनांक १६.४.१९९६.

३. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.०७२१०१/११२/११२९१, दिनांक २०.३.१९९५ व दिनांक २/५/१९९६.

३. शासन निर्णय, कूषि व पदुम विभाग, क्रमांक मत्स्यवि-३६९२/सीआर (१)/ पदुम-१४,दि.२०.३.१९९६ व दिनांक २/५/१९९६.

३. शासन निर्णय, कूषि व पदुम विभाग, क्रमांक मत्स्यवि-१०९७/१२३२/ (७/९७),दि.२९ मार्च, १९९८.

**प्रस्तावनाः-** केंद्र शासनाने, राष्ट्रीय कल्याण निधी. या केंद्र पुरस्कत योजनेअंतर्गत, मच्छिमारांसाठी आदर्श मच्छिमार गावाचा विकास करण्याच्या उद्‌देशाने मच्छिमारांसाठी घरे बांधण्यासाठी रु.३५,०००/- इतक्या मर्यादेपर्यन्त (प्रत्येक घर) आणि प्रत्येक मच्छिमार गावात एक कूम नलिका बांधण्यासाठी रु.२५,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्याची योजना मंजूर केली आहे. सदर अर्थसहाय्य केंद्र व राज्य शासनाकडून ५०:५० या प्रमाणात देण्यात येणार आहे. रागयड जिल्हयातील एक गांव व जळगांव जिल्हयातील ७ मच्छिमार गांवात एकूण २७१ घरे व ८ कूपनलिका बांधण्यांच्या रु.९६,८५,०००/- इतक्या अंदाजित खर्चास शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. मत्स्यवि ३६९२/सीआर-१/पदुम-१४,दिनांक २२ नोव्हेंबर,१९९६ अन्वये प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली

आहे. केंद्र पुरस्कृत योजनेखाली मच्छिमारांसाठी घरे बांधण्याचा व कूपनलिका बांधण्याचे काम जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आरडी ओ) यांचेमार्फत करण्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन होता.

शासन निर्णयः- शासन आता असे आदेश देत आहे की, रायगड व जळगांव जिल्हयातील मच्छिमार गावांत केंद्र पुरस्कृत योनजेखाली मच्छिमारांसाठी घरे बांधण्यास प्रति घर रु.३५,०००/- इतक्या मर्यादेपर्यन्त आणि कूपनलिका (प्रति कूपनलिका रु.२५,०००/- इतक्या मर्यादे पर्यन्त) बांधण्याचे काम, संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (डी.आर.डी.ए.) यांचेमार्फत करण्यास रु.५०,००,०००/- (रुपये पन्नास लाख फक्त) इतकी रक्कम (केंद्र हिस्सा रु.२५,००,०००/- व राज्य हिस्सा रु.२५,००,०००/- मंजूर करण्यात येत आहे.

३. यासंबंधीचा खर्च १९९६-९७ च्या सुधारीत अंदाजपत्रकानुसार मंजूर झालेल्या तरतूदीमधून लेखाशिर्ष मागणी क्र.डी-८ २४०५-मत्स्यव्यवसाय-१२०-मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था १२० (दोन) पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना (दोन), (नऊ), राष्ट्रीय कल्याण निधी योजनेतर्गत मच्छिमारांसाठी घरकूल योजना (दोन) राज्य योजनांतर्गत योजना (२४०५१०४४) (तीन) केंद्र पुरस्क्त योजना (२४०५१०५३) याखाली लाक्षणिय पूरक मागणीद्वारे मंजूर झाल्यानुसार पूर्नविनियोजनाद्वारे भागविण्यात यावा.

४. सदरहू योजनेसाठी येणारा खर्च करण्यासाठी आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा रायगड व जळगांव यांना रक्कम अदा करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच लेखाधिकारी, आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय यांना सदर रक्कम लेखा व अधिदान कार्यालय, मुंबई येथून काढण्यास, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. हे आदेश नियोजन विभाग/ वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९२/९७/व्यय-१, दिनांक ५.२.१९९७ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(वि.रा.बेचरे),
अवर सचिव, महाराष्ट शासन,
कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

प्रति,
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, मुंबई
प्रोदशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, मुंबई/नाशिक.
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, अलिबाग.
जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी,, जळगांव.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

निवासी लेखा अधिकारी, मुंबई
महालेखापाल/महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता)/लेखा परीक्षा), मुंबई
महालेखापाल/महाराष्ट्र -२(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
महालेखापाल/महाराष्ट्र -२, (लेखापरिक्षा), नागपूर